**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 11 No. 6** **July-Aug 2024**

# खानदेशचा प्राचीन इतिहास

**प्रा. नितीन तुकाराम जाधव**
सहा. प्राध्यापक – इतिहास विभाग, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी
**Corresponding Author: प्रा. नितीन तुकाराम जाधव**
**Email:** ntjadhav881@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13194263**

**सारांश :**

प्राचीन कालखंडाच्या साधनांचा विचार केल्यास त्यांची नितांत कमतरता असल्याचे जाणवते. साधनांचे स्थूल मानाने तीन गटात विभाजन केले जाते. एक मौखिक परंपरा, लिखित साधने, भौतिक साधने. खानदेश शब्दाच्या उत्पत्तीबद्दल संशोधकांमध्ये अजूनही एकवाक्यता आढळत नाही. हे नाव ऐतिहासिक असले तरी, त्या संबंधीचा निर्विवाद ऐतिहासिक पुरावा उपलब्ध होत नाही. खानदेश हे नाव कसे पडले असावे याविषयी संशोधकांनी जी अनुमाने व्यक्त केली आहेत. इ स पूर्व ८०० ते ५०० हा कालखंड प्राचीन भारतीय महाजन सत्तांचा कालखंड मानला जातो. यालाच जातक कालखंड असे म्हटले जाते.खानदेश मध्ये सातवाहन, आभीर,वाकाटक, कलचुरी, चालुक्य, सेन्द्रक, राष्ट्रकुट, यादव यांसारख्या घराण्यांनी अनेक वर्ष सत्ता गाजून आपली राजकीय आणि सांस्कृतिक ओळख निर्माण केली. या सत्ता मधील अनेक पराक्रमी राजांमुळे खानदेशचा इतिहास उज्वल झाला आहे.

**महत्वाचे शब्द :** इतिहासाची साधने, मौखिक परंपरा, लिखित साधने, भौतिक साधने, खांडववन, कान्ह देश, कन्यादेश, खाणदेश, वाकाटक, आभीर, चालुक्य, सेन्द्रक, राष्ट्रकुट, यादव.

**प्रस्तावना :**

खानदेशचा इतिहास जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र, गुजरात व लगतच्या नर्मदा खोऱ्यातील माळवा प्रदेशाचा इतिहास समजावा लागतो .खानदेशच्या पश्चिमेकडील गुजरात, उत्तरेकडे माळवा, दक्षिणेकडे व पूर्वेकडे महाराष्ट्र आहे. या केवळ भौगोलिक परिसीमा नसून, ते ऐतिहासिक व सांस्कृतिक संदर्भही आहे म्हणजेच खानदेशाचे ऐतिहासिक वाटचालीमध्ये व संस्कृतीमध्ये, सांस्कृतिक जडणघडणीमध्ये वरील तीन राज्यांचे, तेथील राजवटींचा तसेच तेथील संस्कृती यांचे महत्त्वाचे योगदान ठरते.

**खानदेशाचा इतिहासाची साधने :**

साधना शिवाय इतिहास लिहिणे म्हणजे परीकथा अथवा कादंबरी लिहिण्यासारखे आहे. प्राचीन कालखंडाच्या साधनांचा विचार केल्यास त्यांची नितांत कमतरता असल्याचे जाणवते. साधनांचे स्थूल मानाने तीन गटात विभाजन केले जाते. एक मौखिक परंपरा ,लिखित साधने, भौतिक साधने.

१) खानदेशला बळकट अशा प्रदीर्घ मोठी परंपरेची पार्श्वभूमी लाभली आहे. त्यामध्ये दंतकथा, लोककथा, लोकगीते, आख्याने, पोवाडे आदींचा अंतर्भाव आहे .विशेषतः अभिर आणि गवळी राजांच्या नायकांच्या तथा त्यांच्या पराक्रमांचा गाथांचा यामध्ये अधिक भरणा आढळतो. तसेच खानदेशच्या लोक देवतांच्या आणि लोक अंधविश्वासाच्या ही शेकडो अद्भुतरम्य कथानकांचा, अख्यानांचा यामध्ये मोठा वाटा आहे. लोकसंस्कृतीची उकल करण्यासाठी याचा उपयोग होतो.

साधनांच्या दृष्टिकोनातून दुसरा उपेक्षित घटक म्हणजे, खान्देशात फार मोठ्या प्रमाणात आदिवासी व गिरिजन अस्तित्वात आहेत .त्यामध्ये भिल्ल, पावरा, मावची, कोकण्या, तडवी, कोळी, भामटा, ठाकर आदींचा समावेश होतो. या प्रत्येकाची स्वतःची जगण्याची खास शैली आहे. सातपुडा आणि सह्याद्रीच्या भिन्न भूभागात शतकानुशतके ते वास्तव्य करून आहेत. परिणामी गाव गाड्या बाहेर त्यांची एक सुप्त संस्कृती नांदत आहे.मौखिक परंपरा हाच त्यांच्या जीवनशैलीचा बुद्ध मूलभूत आधार आहे.

२) लिखित साधनांमध्ये रामायण, महाभारत व पुराणे यांचा अंतर्भाव होतो. रामायण, महाभारत ही सर्व भारतीयांची श्रद्धास्थाने असल्याने सर्वच लोकांना उभय महाकाव्यातील प्रसंग घटना आपल्या परिसरात घडल्या असल्याचा आभास होत असतो. खानदेशच्या परिसरही याला अपवाद नाही. त्यामुळे या महाकाव्याची निगडित अशी अनेक स्थळे खानदेशभर विखुरलेले आढळतात. त्यांचे ऐतिहासिक तत्त्व सिद्ध करणे ही अतिशय जटिल समस्या आहे.

पुराणांचा खानदेशाची अगदी जवळून संबंध असल्याचे दिसून येते. पुराणातील ऐतिहासिक परंपरेवर अलीकडे बराचसा प्रकाश टाकण्यात आला आहे. केवळ पुराणकारांनी कबीरांच्या १६७ वर्षाच्या

राजकीय कार्य कृतीची नोंद केल्याचे त्यांचा पडताळा पाहण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

याशिवाय लिखित साधनांमध्ये स्मृती साहित्य, उपपुराणे, धर्मशास्त्रावरील लिखाण, जैन व बौद्ध धार्मिक साहित्य ,रामायण, जैन पुराणे यांचा समावेश असतो शिवाय या प्रदीर्घ कालखंडामध्ये निर्माण झालेल्या धर्मातीत साहित्याचा काव्य कादंबरीचे कथानके, नाटके यांचाही अंतर्भाव होतो.

३) भौतिक साधनमध्ये शीलालेखांना अग्रक्रम द्यावा लागेल. लहान मोठ्या अशा १४ राजवटींचा खानदेशाची इतिहासाच्या भिन्न काळात संबंध आल्याचे त्यांच्या शिलालेखांवरून आणि ताम्रपट यावरून स्पष्टपणे दिसून येते. त्यांची संख्या तुलनात्मकदृष्ट्या मोठी असून, खानदेश इतिहास लेखनासाठी त्यांचा उत्तम उपयोग होतो. राजवटींनी हाय त्याच्या तपशिलाचा आवश्यक तो विचार करण्यात आला आहे त्यामध्ये ताम्रपट यांचाही समावेश करण्यात येतो.

**खानदेश नावाचा उगम :**

महाराष्ट्रातल्या बहुतेक सर्व जिल्ह्यांच्या नावांचा पूर्वापार इतिहास उपलब्ध आहे. त्या नावांचा उत्पत्तीविषयी फारसे मतभेदही नाहीत. मात्र खानदेश शब्दाच्या उत्पत्तीबद्दल संशोधकांमध्ये अजूनही एकवाक्यता आढळत नाही. हे नाव ऐतिहासिक असले तरी, त्या संबंधीचा निर्विवाद ऐतिहासिक पुरावा उपलब्ध होत नाही. खानदेश हे नाव कसे पडले असावे याविषयी संशोधकांनी जी अनुमाने व्यक्त केली आहेत, त्यावरूनच या नावांच्या सार्थकतेचा शोध घ्यावा लागतो.

महाभारतातले प्रसिद्ध 'खांडववन' म्हणजे खानदेश असे काही अभ्यासकांचे मत आहे. त्यात का.बा. मराठे मी. विल्सन, मिस क्लार्क यांचे नावे येतात. थंड वनाचे खानदेश व खानदेश चे नंतर खानदेश झाले असावे कर्नल साईक्स यामध्ये खंड किंवा खिंड या शब्दापासून खानदेश हे नाव निष्पन्न झाले आहे.

सुप्रसिद्ध प्रवासी फेरिष्ता म्हणतो इस बाराशे 94 मध्ये खान देशावर मुसलमानी अंमल बसण्यापूर्वी या प्रदेशाचे तशाच धरतीचे काहीतरी ना होते, पण पुढे फारुकी यांनी राजांनी आपल्या स्थान या पदवीला अनुरूप असे खानदेश नाव रोड केले असे म्हणतात.

सिंगल इयर च्या मध्ये खानदेश चे पूर्वीचे नाव कन्नड देश, म्हणजे कृष्णाचा देश असे होते.

विमिराशी यांच्या मते ,खानदेश चे प्राचीन नाव 'ऋषिक' किंवा 'रुचिक' होते, नंतर सेवन देऊ देश हे नाव कोरीव लेखात व हेमाद्री च्या वृत्त खंडातील राज्य प्रशस्ती मध्ये आढळते.

गुजरातचा सुलतान पहिला अहमद याने ही स १४१७ मध्ये, थाळनेरचा दुसरा फारुकी, राजा मलिक याला खान ही पदवी बहाल केली. मलिकच्या या उपाधी वरूनच त्याच्या ताब्यातील प्रदेशाला खानदेश असे नाव मिळाले असे अबुल फजलने कबरीत नोंदविले आहे.

अकबरी व इक्बालनामा या दोन्ही ग्रंथात' दानदेश' हेच नाव वापरले आहे. श्री वि का राजवाडे यांच्या मध्ये खानदेशचे मूळ नाव आदेश असे होते. देवगिरीच्या यादव कुळातील कृष्ण अथवा कन्नड याने या प्रांताला 'कन्या देश' हे नाव दिले. कान्हा खान या परंपरेने अपभ्रंश होत खानदेश हे नाव प्रचलित झाले.

सातपुड्याच्या खालच्या भागाला खालदेश असे प्रारंभी म्हटले जात असावे. पुढे ल च्या जागी न येऊन खानदेश हे नाव प्रचारात आले असावे असाही एक तर्क श्री पाध्ये करतात.

जळगाव येथील विजय साप्ताहिकाचे श्री मी द पालक यांनी म्हटले आहे' खाण' या शब्दावरून फल्याची भावना उगम पावते. खानदेश ची जमीन अत्यंत सुपीक आहे .तेथे जीवन उपयोगी पदार्थ चांगल्या प्रकारे येतात .तेथे काय वाण ती तर आहे का असा समज होऊन खानदेश हे नाव भाविकपणे पडले .पुढे वर्णन विपर्यास होऊन खानदेशचे खानदेश झाले.

ब्रिटिश पूर्व काळात खानदेश हा कुठल्याही एका सत्तेच्या अधिपत्याखाली नव्हता पूर्व खानदेशचा बराचसा भाग पूर्वीच्या वराडा चावीचे भाग होता. पश्चिम खान्देशचा काही भाग स्थानिक राजांच्या व गुजरातच्या सुलतानांच्या ताब्यात होता. म्हणून खान यांचा देश तो खानदेश हेच नाव अधिक प्रचलित झाले असावे. या नावाला राजा व प्रजा या दोघांची संमती व पाठिंबा होता.

बंधारे किंवा कण किंवा कान म्हणजे बंधारा ज्या भागात बंधाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे तो प्रदेश म्हणजे धरणांचा प्रदेश अर्थात खानदेश या कांदा देशाचेच पुढे खानदेश झाले असावे .

**खानदेश ऐतिहासिक स्थित्यंतरे :**

इ स पूर्व ८०० ते ५०० हा कालखंड प्राचीन भारतीय महाजन सत्तांचा कालखंड मानला जातो. यालाच जातक कालखंड असे म्हटले जाते. ते या काळात महाराष्ट्रात मूलक व अश्मक नाशिक य गोवर्धन ,ग्रामीण जानपदे उदयास आली. यातील बहुतेकांची रामायण, महाभारतामध्ये नोंद आढळते.

**अ) खानदेश आणि सातवाहन :** मौऱ्यानंतर या परिसरावर सातवाहनांची सत्ता निर्माण झाली. सातवाहनांना 'शालिवाहन' या लोकप्रिय नावाने ओळखले जाते. सातवाहन सत्तेच्या उदयाने महाराष्ट्र इतिहासाचा नवा अध्याय सुरु होतो .सातवाहनांचा उदय अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरतो. सातवाहनांनी अनेक लहान-मोठ्या सत्तांना एका राजकीय छत्राखाली आणले. त्यांनी या परिसरातील राजकीय अस्थिरता नष्ट करुन ,४६० वर्षा करिता एक छत्री अंमल प्रस्थापित केला होता.

सातवाहन काळात ज्याप्रमाणे व्यापारी चळवळीचा खानदेशात व्यापक पाया घातला गेला. त्याच प्रमाणेच कलेच्या क्षेत्रातही नवे पर्यायी उघडले गेले .पितळखोरा आणि अजिंठा येथे सुरेख अशा लेण्या खोदल्या गेल्या. त्या

प्रामुख्याने प्रतिष्ठान भृगू, कच्छ व प्रतिष्ठान महिष्मती महामार्गावर आहेत. आज त्या मराठवाड्यात असल्या तरी प्राचीन कालखंडात त्या ऋषिक देशात मोडत होत्या. त्यामुळे कलेच्या निर्मितीमध्ये खानदेश कर यांचा सिंहाचा वाटा असल्याचे स्पष्ट होते.

**ब) खानदेश आणि आभीर :** आभीरांच्या इतिहासाच्या अभ्यासाची साधने अति मर्यादित आहेत. तथापि त्यांची लोकपरंपरा अद्यापही जिवंत आहे. अभिर यांनाच खानदेशात सामान्यतः अहिर अहिर असे म्हटले जाते. खान्देश हे भारतीय पातळीवरील अहिरांची महत्त्वाचे स्थान आहे.

आभीरांना थोर ऐतिहासिक परंपरा असून, महाभारतापासून ती प्रचारात आल्याचे स्पष्ट होते. त्या परंपरेनुसार त्यांच्या वसाहतीत पंजाब, राजस्थान आणि सिंध आदी प्रदेशात विस्तारल्या होत्या. कालौघात ते सौराष्ट्र गुजरात माळवा पर्यायाने खानदेशात स्थलांतरित झाले .येथूनच त्यांचे दक्षिणेकडे स्थलांतर झाले .तथापि गुजरात, माळवा आणि खानदेशचा भूप्रदेश त्यांनी आपल्या कायमच्या वास्तव्यासाठी निवडला हे विशेष होईल. ही परिस्थिती सामान्यतः जातकाला नंतर झाली असावी असे वाटते.

**क) देश आणि वाकटक :** प्राचीन महाराष्ट्रातील श्रेष्ठ सत्ते पैकी वाकाटक एक श्रेष्ठ सत्ता होती. ते गुप्तांचे समकालीन असून, उभय करण्यामध्ये वैवाहिक संबंध होते . घराण्यांनी इस २५० ते ५५० असे राज्य केल्याचे जाणवते. महाराष्ट्र व मध्यप्रदेशाच्या काही भागावर त्यांनी राज्य केले .तसेच नर्मदेच्या उत्तरेस असलेल्या मालव मायकल प्रचिती सत्तांनी वाकाटकांचे वर्चस्व मान्य केले होते. त्यांचा आणि खानदेशाचा संबंध पाचव्या शतकाच्या उत्तरार्धात आल्याचे अभी लेखी पुरावे उपलब्ध आहेत. त्यांच्या कारकीर्दीचा प्रारंभ विदर्भा कडून झाला आणि पृथ्वी वेसनाचे कार्य करीत इस ३८५ च्या सुमारास त्यांचे महाराष्ट्रावर वर्चस्व प्रस्थापित झाले.

अजंठा लेण्यातील वाकाटक कालीन शिलालेख 'लेणी क्रमांक १६ व १७ च्या 'दर्शनी भागात प्रस्तुत शिलालेख आहेत .लेखाची लिपी ब्राम्ही पेटिका शीर्षक असून, भाषा संस्कृत आहे. सोळाव्या लेखा लेण्यांच्या लेखात वाकाटक नृपती हरिषेण यांची वंशावळ दिली आहे .

**ड) खानदेश आणि कलचुरी सत्ता (महेशमती चे कलचुरी) :** महिष्मती चे कल्चुरी स्वतःला वंशी मानतात. कारण महिष्मती नगरी ची स्थापना वंशी महेश मन नावाच्या राजाने केल्याची समजूत आहे. त्याचे आपण वारसदार असल्याने आपण वंशज आहोत अशी कल्चुरी राजवंशाची धारणा होती. महिष्मती चे अनेकांनी अतिशय सुरेख असे वर्णन केले आहे. तथापि आपणास येथे त्यांच्या खानदेश संबंधांचा विचार करावयाचा आहे. अलीकडे महिष्मती आणि इंदूर जवळचे महेश्वर असा वाद निर्माण झाला आहे. कारण महेश्वर ही तितकेच पुरातन आहे.

**इ) खानदेश आणि चालुक्य घराणे :** दक्षिण भारतातील चालुक्य राजवटीत खानदेशच्या इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. त्यांची राजधानी बदामी येथे असल्याने इतिहासात त्याची नोंद बदामीचे चालुक्य म्हणून केली जाते. त्यांनी इस ५३५ ते ७४५ अशी २०० वर्षे राज्य केले मंदिर स्थापत्याचा उदय व विकास हे त्यांच्या कारकीर्दीचे खास वैशिष्ट्य मानावे लागते. चालुक्य हे स्वतःला हरिती पुत्र म्हणवीत असत. 'जयसिंह' हा त्यांचा मूळ पुरुष असावा. त्यानेच महाराष्ट्र कर्नाटकाच्या सीमेवरील भूप्रदेश जिंकून राज्य स्थापन केल्याचे सांगितले जाते.

**ई) खानदेश आणि सेंद्रक घराणे :** सेंद्रक हे बदामीच्या चालुक्यांची सामंत घराणे. ते आरंभीचे दाक्षिणात्य घराने वानू शक्ती भानू शक्ती हा या घराण्याचा मूळ पुरूष ते प्रथम कदंबा कडे होते .नंतर ते चालुक्या कडे आले. त्याने चालुक्यांचा विश्वास संपादन केला, म्हणून सेंद्रक आन्ना उत्तर महाराष्ट्राचा कारभार पाहण्यासाठी तापी खोऱ्यात प्रांत अधिकारी म्हणून स्थलांतरित केले. सेंद्रक आच्या चार पिढ्यांनी खान देशावर चालुक्यांचे सामंत म्हणून राज्य केले. त्यांनी आपल्या स्वामी सारखीच बिरुदे धारण केली .उदा श्रीवल्लभ पृथ्वी वल्लभ, सत्या श्रेय विक्रमादित्य आधी. ते स्वतःचा उल्लेख निकुंभ, निकुंब पौराणिक साहित्य म्हणून करतात. म्हणजे सेंद्रक हेच निकुंभ होत आणि भानू शकतील हा त्यांचा मूळ पुरुष होय.

**उ ) खानदेश आणि राष्ट्रकूट घराणे :** खानदेश आणि राष्ट्रकूट घराणे महाराष्ट्राच्या प्राचीन घराण्यांपैकी राष्ट्रकूट हे महत्त्वाचे घराणे होय. अन्य प्राचीन राज्य घराण्यांच्या प्रमाणेच राष्ट्रकूटांचे मूलस्थान त्यांचा कालखंड व त्यांची वंशावळ यासंबंधी संशोधक आत एकमत नाही. तसेच त्यांच्या राजधान्या मध्ये सतत स्थित्यंतरे होत गेली. त्यामुळे या मतभेदाला आवश्यक ते इंधन प्राप्त झाले. तथापि राष्ट्रकूट हे या भूप्रदेशातील प्राचीन घराणे असून, त्यांचे उल्लेख मौर्य सम्राट अशोकाच्या शिलालेखात पासून मध्ये युगापर्यंत केलेले दिसून येतात .त्यांच्या साम्राज्या विषयीचा याची व्याप्ती ही राजस्थान पासून म्हैसुरपर्यंत अशी प्रचंड होती की नकळत त्यांची तीन प्रमुख घर आणि महाराष्ट्रावर राज्य करीत होती. मानापुर चे घराणे मानोर जि ठाणे इसवीसन ४२५ ते ५५० दुसरी शाखा बदामीच्या चालुक्यांच्या समकालीन असून तिचे कार्यक्षेत्र विदर्भ होते चालुक्याच्या समकालीन असून तिचे कार्यक्षेत्र विदर्भ होते.

**ऊ) खानदेश आणि यादव घराणे :** खानदेश आणि यादव घराणे सातवाहनांनंतर खानदेश आवर दीर्घकाल वर्चस्व गाजवणारे घराणे म्हणजे यादव घराणे होय. यादव कालखंडात पर्यावरणात अनुकूल बदल झाले होते पर्जन्यमान काही प्रमाणात वाढून परिसरामध्ये शेतीला पोषक असे वातावरण निर्माण झाले होते. सामंत म्हणून व चक्रवर्ती राज्यकर्ते म्हणून यादवांनी या भूप्रदेशावर तीनशे वर्षांहून अधिक काळ राज्य केले .त्यांच्या कालखंडात सुबत्ता निर्माण झाल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात साहित्य स्थापत्य निर्माण झाले .व्यापार ,वाणिज्य वाढ होऊन राष्ट्रीय महामार्ग नव्याने गजबजले. जीर्णशीर्ण ओसाड पडलेल्या नगरांना नवचैतन्य प्राप्त झाले .शिवाय यादव नृपती च्या अनुदार धोरणामुळे समाज जीवनातल्या सर्व थरातील घटक त्यांच्या आश्रयार्थ आल्याने कलीचे दालन व्यापक व समृद्ध झाले होते.

**समारोप :**

महाराष्ट्राच्या अभिजात अशा प्रादेशिक विभागांपैकी खानदेश एक विभाग होय. अन्य चार भाग म्हणजे, कोकण, पश्चिम महाराष्ट्र ,मराठवाडा आणि विदर्भ होय. या प्रत्येक भागाचे स्वतःचे असे खास भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्या वैशिष्ट्य तथा व्यक्तिमत्व आहे. केवळ प्रशासनाच्या गरजेनुसार त्यांची उभारणी झालेली नसून त्यांच्या भौगोलिक मर्यादामुळे, त्यांना परस्परांपासून मदत करण्यात आले असल्याने प्रशासनाला त्या अनुषंगाने आपले प्रादेशिक विभाग बनवावे लागल्याचे दिसते.

**संदर्भ :**


1. पुष्पलता करनकाळ ,खानदेशातील लोक देवता, गोदावरी प्रकाशन ,1997 पृष्ठ 13 ते 20
2. मांडे प्रभा, गाव गाड्या बाहेर ,परिमल प्रकाशन, औरंगाबाद ,1983 परिघाबाहेर रिसप्त संस्कृती
3. मोरवंचीकर राजश्री ,खानदेश इतिहास, जगताप संपा, ग्रंथातील प्रकरण वरळीकर रपू
4. पानसे मू.ग. 'यादव कालीन महाराष्ट्र,' ग्रंथ संग्रहालय, पृष्ठ 174 ते 177 प्रकाशन 1963.
5. डॉ. मु.बा. शहा, 'खानदेश नामचर्चा' खानदेशचा संस्कृतिक इतीहास, खंड 1,2.
6. मोरवंचीकर- ,'पूर्वोक्त सातवाहनकालीन महाराष्ट्र.'
7. मिराशी, वा.वी.,' संशोधन मुक्तावली,' सर 9,
8. पाटील, डी.जी, 'खान्देशचा सांस्कृतिक इतिहास' खंड 1 ,खानदेशचा भूगोल,
9. गॅझेटियर, धुळे जिल्हा
10. गॅझेटियर, नंदुरबार जिल्हा
11. गॅझेटियर, जळगाव जिल्हा
12. गॅझेटियर, नाशिक जिल्हा
13. Pargiter P.P., 'The text the Diana stick of Kohli age,'October 1913, Pargiter P.P. historical tradition among the puranas.
14. Litagikar N.S. (ED) collected works of Bhandarkar- III,
15. Morwanchikar R.S. 'python through the age', New Delhi, 1985
16. Thapar, romila,' ancient India'